# वार्षिक अहवाल
## २०२५-२६




नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

**DINBANDHU**
**Gramin Vikas sanstha, Deori**

**दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी**

ता.देवरी जि.गोंदिया.

# प्रस्तावना

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेची संस्था नोंदणी सन-१८६० च्या अधिनीयम २१ अन्वये दि.२६ डिसेंबर २०१४ रोजी धर्मदाय संस्था म्हणुन सहाय्यक धर्मदाय निबंधक गोंदिया यांच्याकडे नोंदणीकृत झाली. दिनबंधु ग्रामीण विकास संस्था ही स्वयंसेवी सामाजीक संस्था असल्याने ना नफा-ना तोटा या तत्वानुसार ही संस्था सामाजिक क्षेत्रात जनसामान्यांसाठी विविध लोकाभिमुख कार्य करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षात प्रामुख्याने रोजगार व स्वयंरोजगार, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक, सांस्कृतिक असे सामाजीक दायीत्व या विषयांवर संस्थेने कार्य केले आहे. या वर्षात संस्थेने या विषयांवर कार्य करत असतांना संस्थेला आता पर्यंत मिळालेल्या कार्याची फलश्रृती एका वेगळ्या रुपात दिसुन आली असल्याने संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांचा आनंद आणि उत्साह द्विगुणीत झाला आहे.

दिवसेदिवस होत असलेल्या प्रगतीमागे जनसामांन्याकडुन मिळालेले सहकार्य आणि आशिर्वाद आहेत. ते उत्तरोत्तर निरंतर मिळत राहावे अशी संस्थेच्या विश्वस्त मंडळाकडुन प्रार्थना आहे.

“सेवेने अंगी सामर्थ्य येते।<br>
जे जे बोलाल तेची होते।<br>
हस्ते परहस्ते सर्वची होते।<br>
काम त्याचे ।।”

- ग्रामगीता

# अध्यक्षांचे मनोगत

सप्रेम नमस्कार...

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेचा सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करत असतांना आम्हाला अतीशय आनंद होतो आहे त्याचे कारण असे की संस्था विविध क्षेत्रात सामाजीक उपक्रमाचे आयोजन करीत असते परंतु या वर्षात कार्य करीत असतांना काही विशिष्ट क्षेत्रात संस्थेला कार्य करावे लागले.

संस्था स्थापनेपासुन अनेक विषयात कार्य करीत आलेली आहे. परंतु या आर्थिक वर्षात संस्थेचे प्रमुख लक्ष केंद्रीत कसलेले शिक्षण या क्षेत्रासोबत स्वच्छता, आरोग्य, रोजगार, क्रीडा व सांस्कृतिक आणि इतर सामाजिक क्षेत्रात समाजाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी काय करता येईल अशा क्षेत्रात संस्थेनी या वर्षात कार्य केलेले आहे.

प्रत्येक वर्षात वेगवेगळया उपक्रमांना संस्थेला जनसामान्यांचे मिळणारे सहकार्य व प्रेम यात वाढ होत असुन आम्ही हाती घेत असलेल्या सर्व उपक्रमांना असाच प्रतिसाद मिळत राहील हीच अपेक्षा !

ग्रामसुधारणेचे मुलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।
संघठन हेची शक्तीचे सुत्र । ग्रामराज्य निर्माण करी ।।

आपला विश्वासू

कुलदिप द. लांजेवार
अध्यक्ष
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

# संस्थेविषयी....

संस्थेचे नांव : दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र-२२६/१४ (गोंदिया), संस्था अधिनीयम, १८६० नियम २१ एफ-१८५६ (गोंदिया), मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० नियम २९

संस्थेचे पॅन क्रमांक : AADTD6124H

कार्यालयाचा पत्ता : C/o. श्री. दयारामजी लांजेवार, शेडेपार रोड, पंचशिल चौक, देवरी ता. देवरी, जि.गोंदिया ४४१९०१ (महा.)

संपर्क क्रमांक : ७२१८९४२६२६, E-Mail : dgvsdeori@gmail.com

वेबसाईट : www.dinbandhugraminvikassanstha.org

## संस्थेचे उद्देश :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मदत करणे.

२) सुशिक्षीत बेरोजगार ग्रामीण युवकांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

३) आदिवासी व इतर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणुन त्यांना स्पर्धा परिक्षेच्या संदर्भात सर्वतोपरी मदत करुन प्रशासकीय सेवेत रुजु होण्यासाठी सक्षम करणे.

४) ग्रामीण व नागरी क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कृषि, आरोग्य, शिक्षण, मुलभुत अधिकार या सारख्या लोकाभिमूख विषयांवर जनजागृती करुन नागरीकांना विकासाच्या प्रवाहात आणणे.

५) प्रशासनासोबत राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन, जनहितार्थ कार्यक्रमांचे आयोजन करणे.

## संस्थेची विशेषता :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी संस्था निरंतर मदत करीत आहे.

२) सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी संस्थेने अनेक रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले तसेच ते कार्य पुढेही सुरु राहील असे संस्थेचे ध्येय आहे.

३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीसह योग्य तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवुन देण्यासाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

४) प्रशासनासोबत जनसामान्यांसाठी आयोजीत कार्यक्रमात संस्था नेहमीच सहभागी होवून यशस्वी कार्यक्रम करण्यासाठी सहकार्य करीत असते.

५) नैसर्गीक साधन संपत्तीचे जतन करणे तसेच शिक्षण, आरोग्य, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता या विषयांवर नियमीत मार्गदर्शन करीत राहाणे, जनजागृती करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य आहे.

# संस्थेचे कार्य

## आरोग्य-सामाजिक

### १) दम्याच्या आजारावर मोफत औषध वितरण शिबीर

दि. ०६ आक्टोबर २०२५

स्थान : आफताब मंगल कार्यालय, देवरी











## संस्थेचे कार्य

### आयोजनाचे उद्देश :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागात दमा या आजाराबाबत जनजागृती निर्माण करणे व दमाग्रस्त रुग्णांना आरोग्य सहाय्य मिळावे या उद्देशाने कोजागीरी पोर्णिमाचे औचीत्य साधुन मोफत औषध वितरण शिबीराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या उपक्रमाच्या माध्यमातुन रुग्णांना आवश्यक औषध उपलब्ध करुन देत त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करणे, तसेच समाजात निरोगी जीवनशैली व आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख हेतु आहे.

### विशेष उपस्थिती :

- मा.सौ.उषाताई शहारे,
  जि. प. सदस्या, गोंदिया
- मा. श्री. यादोराव पंचमवार,
  संचालक, कृषि उत्पन्न बाजार समिती, देवरी
- मा. श्री. डॉ. गुरु मा. कापगते, देवरी
- मा. सौ. डॉ. सुजाता ताराम, देवरी
- मा. श्री. डॉ.अमित येडे, देवरी
- मा. श्री. डॉ. सुजित टेटे,
  मुख्याध्यापक ब्लासम पब्लीक स्कुल, देवरी
- मा. श्री. डॉ. सुनिल समरीत,
  अध्यक्ष, सुवर्णप्राशन फाऊंडेशन
- मा. कुलदिप लांजेवार,
  अध्यक्ष, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

**देशोन्नती**

# दमा या आजारावर मोफत औषध वितरण शिबीर

**विदर्भातील ५५७ गरजू रुग्णांनी घेतला सहभाग**



**देवरी** - गोंदिया जिल्ह्यातील स्थानिक देवरी येथील आफताब मंगल कार्यालयात सुवर्णप्राशन फाऊंडेशन, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमा चे औचित्य साधून दमा,जुनाट सर्दी,अस्थमा, एलर्जी अश्या प्रकारची आजार बरे होण्यासाठी मोफत आयुर्वेदिक औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गत ४ वर्षांपासून या शिबिराचे आयोजन केले जात असून ,या शिबिराला विदर्भातील विविध जिल्ह्यातील रुग्णांचा उत्सुर्फत्त प्रतिसाद मिळत असून गोंदिया, भंडारा, गडचिरोली, नागपूर,चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यातील जवळपास ५५७ रुग्ण सहभागी झाले असून,आयुर्वेदाचार्य सुनील समरीत यांच्याकडून त्यांची चिकित्सा करून ४९७ रुग्णांना दमा या आजाराच्या औषधी चे मोफत वितरण कृषी उत्पन्न बाजार समिती देवरी चे संचालक यादोराव पंचमवार यांच्या अध्यक्षतेखाली तर जि.प. सदस्या सौ. उषाताई शहारे, डॉ. गुरुदेव कापगते, डॉ. अमित येडे,डॉ. सुजाता ताराम,ब्लॉसम पब्लिक स्कुल चे मुख्याध्यापक डॉ. सुजित टेटे,पंचायत समीती चे ग्राम विस्तार अधिकारी झामरे,सुवर्णप्राशन फाउंडेशन चे संस्थापक/अध्यक्ष आयुर्वेदाचार्य सुनील समरीत,दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष मा. कुलदिप लांजेवार,सुवर्णप्राशन चे विश्वस्त डॉ. रुपेश परशुरामकर,यांच्या हस्ते वितरण करण्यात आले असून शरद पौर्णिमा आणि दमा या आजाराचा निकटचा संबंध असल्याने आणि दिवसेंदिवस हे आजाराची लागण वाढतअसल्याने दरवर्षी कोजागिरी पोर्णिमा च्या दिनी हे शिबीर आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील समरीत, संचालन विलास शिंदे तर आभार कुलदिप लांजेवार यांनी मानले.

Gondia Edition
Oct 07, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com




लोकमत

# नि:शुल्क औषध वितरणाचा ५५७ रुग्णांनी घेतला लाभ

सुवर्णप्राशन फाउंडेशन, दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

मागील ४ वर्षांपासून या औषध वाटप शिबिराचे आयोजन केले जात आहे

मुलीला औषधीचे पाकीट देताना सुनील समरीत, यादोराव पंचमवार व अन्य





ePaper नवभारत Gondia | 08 October 2025 | Page 2

उपचार : विदर्भ के 557 जरुरतमंद मरीजों ने लिया लाभ

# दमा मरीजों को नि:शुल्क दवा वितरण


ePaper नवराष्ट्र Gondia | 08 October 2025 | Page 4

उपक्रम — देवरी येथे औषध वितरण, सुवर्णप्राशन फाउंडेशनचा पुढाकार

# ५५७ गरजवंतांना दमा औषधीचा लाभ

४ वर्षापासून रुग्णांसाठी उपक्रम सुरू

## आयोजनाचे साफल्य :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमा निमित्त दमा (अस्थमा) या आजारावर मोफत औषध वितरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात पूर्व विदर्भातील गोंदिया,भंडारा, नागपूर, गडचिरोली, वर्धा या जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने रुग्ण सहभागी झाले. एकूण ५५७ रुग्णांनी शिबिरात नोंदणी केली, सर्व रुग्णांची चिकित्सा करून त्यापैकी ४९७ रुग्णांना दमा या आजारावरील मोफत औषधांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना उपचाराची संधी उपलब्ध झाली तसेच दमा आजाराविषयी जागरूकता वाढण्यास मदत झाली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेले हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

# सांस्कृतिक-सामाजिक

## २) दिवाळी पहाट : "पहाट दिवाळीची - साथ सुरेल स्वरांची"

दि. १८ आक्टोबर २०२५

स्थान : तालुका क्रिडा संकुल, देवरी




### आयोजनाचे उद्देश :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने धनत्रयोदशी च्या शुभमुहूर्तावर आदिवासी बहुल भागात प्रथमच "दिवाळी पहाट" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागील उद्देश म्हणजे दिवाळीच्या पावन पर्वाचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांमध्ये सांस्कृतिक परंपरांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, युवक-युवतींमध्ये सांस्कृतिक जाणीव वाढविणे तसेच समाजात एकोपा, बंधुभाव आणि आनंदाचे वातावरण निर्माण करणे हाही या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.





## विशेष उपस्थिती :

- मा. श्री. उमेश काशिद,
  प्रकल्प अधिकारी,
  ए. आ. विकास प्रकल्प देवरी
- मा. श्री. विवेक पाटील,
  उपविभागीय पोलीस अधिकारी,
  देवरी
- मा. श्री. प्रशांत संगीडवार,
  अध्यक्ष, माँ धुकेश्वरी मंदिर समिती
  देवरी
- मा. श्री. डॉ. प्रशांत ठाकरे,
  राष्ट्रीय प्रबोधनकार
- मा. श्रीमती प्रज्ञाताई संगीडवार,
  उपाध्यक्ष, नगरपंचायत देवरी









TheHitavada
Vidarbha Line | 2025-10-21 | Page- 12
ehitavada.com

## Captivating performances at *Diwali Pahat*

Our Correspondent
DEORI, Oct 20



लोकमत

मस्ट READ

## सप्तसुरांच्या मैफिलीने सजली देवरीकरांची दिवाळी पहाट

**एकाहून एक सरस सादर गीतांनी घेतला रसिक मनांचा ठाव**

लोकमत न्यूज नेटवर्क

**देवरी :** स्थानिक देवरी शहरातील तालुका क्रीडासंकुलाच्या मैदानात शनिवार (दि. १८) दीनबंधू ग्रामीण विकास संस्था व मित्रपरिवार यांच्या वतीने 'पहाट दिवाळीची - साथ सुरेल स्वरांची' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सप्तसुरांच्या मैफिलीने देवरी तालुक्यातील संगीत रसिक मंत्रमुग्ध झाले. या संगीत मैफिलीत एकाहून एक सरस सादर गीतांनी रसिक मनांचा ठाव घेतला.

उत्सवांची नगरी असा लौकिक असलेल्या देवरीत सणानिमित्त लोकांनी एकत्र यावे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि दिवाळीचा आनंद द्विगणित व्हावा, या हेतूने 'दिवाळी पहाट' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी तहसीलदार महेंद्र गणवीर, नगर पंचायत उपाध्यक्ष प्रज्ञा संगीडवार, धुकेश्वरी मंदिर समितीचे अध्यक्ष प्रशांत संगीडवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यादोराव पंचमवार, राष्ट्रीय कीर्तनकार प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि मित्रपरिवाराच्या संपूर्ण सदस्यांच्या उपस्थितीत या दिवाळी पहाट मैफिलीची सुरुवात झाली. सलग तीस तास रंगलेली ही मैफल संपू नये, अशी प्रत्येक उपस्थित रसिक प्रेक्षकांची भावना होती. 'तुझं मागतो मी आता' या गीताने कार्यक्रमाची दमदार सुरुवात झाली. सूर निरागस हो, कानडा राजा पंढरीचा, झिनी झिनी वाजे बिन, कानडा राजा पंढरीचा.. अशा एकापेक्षा एक मराठी, हिंदी गीतांनी ओवीपासून अभंगापर्यंत व भूपाळी, मराठी-हिंदी गझल, देशभक्तिपर गीत, जयोस्तुते श्री महान्मंगले या गीतांनी बहरून आलेल्या या सप्तसूरांच्या मैफिलीला गायक विजय वाहोकर, प्रज्योत देशमुख, तनुश्री भालेराव यांच्या गायनाने आणि मनोज राऊत, आनंद बोराटने, रामजी लाहूडकर, अतुल डोंगरे, सागर पारेकर यांच्या संगीताने रसिकांना मंत्रमुग्ध केले. आपल्या ओजस्वी वाणीतून सदाबहार निवेदनाची साथ राष्ट्रीय कीर्तनकार प्रा. प्रशांत ठाकरे यांनी दिली.

दिवाळी पहाट या सप्त सुरांच्या मैफिलने तालुक्यातील रसिक झाले मंत्रमुग्ध

दिवाळी पहाट कार्यक्रमात गीत सादर करताना विजय वाहोकर, तनुश्री भालेराव.

**कार्यक्रमासाठी यांनी केले सहकार्य**

संचालक कुलदीप लांजेवार, मित्रपरिवाराचे सदस्य यादोराव पंचमवार, विजय गहाने, प्राचार्य प्रदीप रामटेके, चेतन उईके, अरविंद शेंडे, विलास शिंदे, युगेश बिसेन, संदीप महोबिया, सुशील शिंदे, किशोर येनप्रेडीवार, अमित तरजुले, दिवाकर शेंद्रे, सोमाजी आस्वले, डॉ. सुनील समरीत, विनोद चौधरी, शुभम वाडीभस्मे, सिद्धान्त शाहू, दीपक लांजेवार, अंकुश गुप्ता, गुलशन नाईक, करण श्रीभाद्रे, योगेश साखरे, मंदार देव, रंजित धमगाये, डॉ. रूपेश परशुरामकर, अनिल शर्मा, सुशील जैन, लोकेश सोनुने, हितेश्री समरीत, मौसमी नेताम, भुवनेश निर्वाण यांनी सहकार्य केले.

Hello Gondia
Page No. 2 Oct 19, 2025
Powered by: erelego.com



ePaper
नवराष्ट्र Gondia | 19 October 2025 | Page 4

## सप्तसुरांच्या मैफिलीने रंगली 'दिवाळी पहाट'

देवरी, (ता. प्र.). 'वेदानांही नाही कळला अंतपार याचा, कानडा राजा पंढरीचा...' या महाकवी ग. दि. माडगूळकरांच्या भक्तीगीतासह कानात शहद घोळणाऱ्या एकाहून एक सुरेल सुगम गीत-भक्तीगीतांची मेजवानी आज पहाटे साडेपाचच्या सुमारा स्थानिक क्रीडा संकूलाच्या मैदानावर सप्तसुरांच्या मैफिली'ने रंगली.

देवरी येथील दीनबंधू ग्रामीण विकास या सामाजिक संस्थेच्या पुढाकारने ही संगीत पहाट या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या संगीत मैफिलीत सुप्रसिद्ध गायक विजय वाहोकार, प्रज्योत देशमुख आणि तनुश्री भालेराव यांनी श्रौत्यांना आपल्या सुरेल आवाजात अनेक भक्तीगीतांसह सुगम संगीताने मंत्रमुग्ध केले.

या गायकांना मनोज राऊत, आनंद बोराटने रामजी लाहुडकर, अतुल डोंगरे आणि सागर पारेकर यांनी संगीताची साथ लाभली. या संपूर्ण संगीत मैफिलीमध्ये प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे यांनी भारदस्त निवेदन सादर केले. या दिवाळी पहाट संगीत मैफिलीत देवरीकरांनी प्रचंड उपस्थिती दर्शवीत संगीताचा लाभ घेतला.



देशोन्नती

## 'सप्तसुरांच्या मैफिली'ने सजली देवरीकरांची 'दिवाळी पहाट'

**दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेचे अनोखे आयोजन**

**देवरी :** 'वेदानांही नाही कळला अंतपार याचा, कानडा राजा पंढरीचाष्ठ' या महाकवी ग. दि माडगूळकरांच्या भक्तीगीतासह कानात शहद घोळणाऱ्याएकाहून एक सुरेल सुगम गीत-भक्तीगीतांची मेजवानी आजपहाटे साडेपाचच्या सुमारास स्थानिक क्रीडा संकूलाच्या मैदानावर श्रोत्यांच्या पुढ्यात वाढण्यात आली.

देवरी येथील दीनबंधू ग्रामीण विकास या सामाजिक संस्थेच्या पुढाकारने या संगीत पहाट या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या संगीत मैफिलीत सुप्रसिद्ध गायक विजय वाहोकार, प्रज्योत देशमुख आणि तनुश्री भालेराव यांनी श्रौत्यांना आपल्या सुरेल आवाजात अनेक भक्तीगीतांसह सुगम संगीताने मंत्रमुग्ध केले. या गायकांना मनोज राऊत, आनंद बोराटने रामजी लाहुडकर, अतुल डोंगरे आणि सागर पारेकर यांनी सगीताची साथ लाभली. या संपूर्ण संगीत मैफिलीमध्ये प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे यांनी भारदस्त निवेदन सादर केले. या दिवाळी पहाट संगीत मैफिला देवरीकरांनी प्रचंड उपस्थिती नोंदवीत संगीताचा आस्वाद घेतला.

Gondia Edition
Oct 19, 2025 Page No. 8
Powered by: erelego.com

## आयोजनाचे साफल्य :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र राज्याच्या पूर्व टोकावर असलेल्या आदिवासी बहुल भागातील देवरी नगर पंचायत क्षेत्रात प्रथमच "दिवाळी पहाट" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अकोला येथील कलाकार यांनी या कार्यक्रमात पारंपरिक गीत, संगीत व सांस्कृतिक सादरीकरणांच्या माध्यमातून दिवाळीच्या सणाचा आनंद सर्वांनी अनुभवला. या अभिनव उपक्रमामुळे आदिवासी बहुल भागात सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले तसेच नागरिकांमध्ये एकोपा, बंधुभाव आणि आनंदाची भावना दृढ झाली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल सर्व सहभागी कलाकार, मान्यवर व सहकार्य करणाऱ्या मित्र परिवाराचे आभार व्यक्त करण्यात आले.

# सामाजिक

## ३) आमची दिवाळी वंचितांसाठी

दि. २२ आक्टोबर २०२५

स्थान : ग्राम : कलकसा, ता. देवरी, जि. गोंदिया

### आयोजनाचे उद्देश :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी "आमची दिवाळी वंचितांसाठी" हा उपक्रम आयोजीत करण्यामागील प्रमुख उद्‌देश म्हणजे समाजातील गरजु, वंचित व दुर्बल घटकांपर्यंत दिवाळीच्या आनंदाचा वाटा पोहचविणे हा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातुन गरजु कुटूंबाना फराळ, कपडे, मिठाई, क्रिडा व शैक्षणिक साहित्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करुन त्यांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. तसेच समाजातील सक्षम घटकांनी वंचित बांधवांच्या मदतीसाठी पुढे यावे व समाजात सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागावी हा या उपक्रमाचा हेतु होता.

### विशेष उपस्थिती :

- मा.श्री.चैनसिंगजी मडावी, गणुटोला
- मा.श्री.अन्नाजी जैन, चिचगड
- मा.श्री.चेतककुमार झंजाळ, सामाजिक कार्यकर्ता, देवरी
- मा.श्री.विनोदजी चौधरी, संचालक, भंडारा-गोंदिया कर्मचारी पत संस्था
- मा.श्री.चेतन उईके, विश्वस्त दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी



देशोन्नती

वंचितांच्या चेहऱ्यावर उमटले समाधानाचे हास्य

देशोन्नती वृत्तसंकलन

**देवरी** : दिवाळीचा सण मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रत्येक व्यक्ती आपल्या सोयीप्रमाणे दिवाळी सण साजरा करून आनंद व्यक्त करतो. तर काही सामाजिक बांधिलकी जपून दिवाळी सण साजरा करण्याला महत्व देतात. असाच उपक्रम दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी आणि सुवर्णप्राशन फाउंडेशन साकोली तसेच मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मागील ४ वर्षांपासून राबविला जात आहे. 'आमची दिवाळी वंचितांसाठी' या अनोख्या उपक्रमातंर्गत २२ ऑक्टोबर रोजी देवरी तालुक्यातील अतिसंवेदनशील आदिवासीबहुल, नक्षलग्रस्त क्षेत्रातील कलकसा गावात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान नविन वस्त्र, शालेय व क्रिडा साहित्यासह फराळ वितरीत करून गावकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

कलकसा येथे 'आमची दिवाळी वंचितांसाठी' उपक्रम

कार्यक्रमाच्या अध्यक्षसीानी सामाजिक कार्यकर्ते चैनसिंग मडावी होते. प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील उद्योजक शनोद दास, चेतक झंजाळ, अण्णाजी जैन, सोमाजी आस्वले, सुवर्णप्राशन फाऊंडेशनचे संस्थापक/अध्यक्ष डॉ. सुनील समरीत, दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार, महेश रहांगडाले, युगेशकुमार बिसेन, संदिप महोबिया, निखिल झिंगरे, युवराज कोल्हारे, तपेश काशीवार, सौ. निवेदिता दास, सौ. हितेश्री समरीत आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ग्राम कलकसा येथे आयोजित या उपक्रमात जवळपास गरजू ४३ कुटुंबातील २१७

अतिसंवेदनशील भागातील नागरिकांना वस्त्र, शालेय व क्रीडा साहित्य आणि फराळाचे वितरण

महिला-पुरुष, लहान बालक, दिव्यांग बंधू, वृद्ध नागरिक प्रमुख यांना नवीन कपडे, फळं, फराळ व मिष्ठान या साहित्याचे वितरण करण्यात आले. यामध्ये सर्व कुटुंबातील लहान व मध्यम बालकांना नवीन कपड्यांसह शैक्षणिक व क्रीडा साहित्य, वितरीत करून अनोख्या रुपात दिवाळी हा सण साजरा करण्यात आला असून उपस्थित स्वयंसेवकांनी आनंदाने मुलांपर्यंत दिवाळीचा प्रकाश पोहोचविला.

गत ५ वर्षापासून संस्थेला मिळत असलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे संपन्न होत असल्याचे दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार यांनी सांगितले. या उपक्रमाला यावर्षी ०६ वर्ष पूर्ण होत असून संस्थाना आर्थिक, वस्तू आणि इतर स्वरूपात सहकार्य करणाऱ्या दानदात्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्यातुन संस्थेअंतर्गत सामाजीक क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याची वलये विस्तारीत होत असल्याचे आयोजकांकडुन व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन रंजीत धमगाये, प्रास्ताविक कुलदिप लांजेवार तर समारोपिय आभार वनरक्षक करणं चौव्हान यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिवाकर शेंद्रे, दिपक लांजेवार, शुभम वाडीभस्मे, भूवनेश्वर निर्वाण, सिद्धांत शाहू, अंकुश गुप्ता, गुलशन नाईक, मनिष ठलाल, नरेंद्र सांडील, योगेश साखरे, किरणकुमार रामटेके, सीतेशकुमार ईश्वर, सुरेश राठी, मनोज कोडापे, संजय महोबिया, कुलदिप बघेले, अनिल भोगारे यांच्या सह संस्थेच्या स्वयंसेवकांनी आणि ग्रामवासीयांनी सहकार्य केले.

Gondia Edition
Oct 24, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com



देशोन्नती

# 'आमची दिवाळी वंचितांसाठी' उपक्रम उत्साहात

## वंचितांच्या चेहऱ्यावर उमटले समाधानाचे हास्य

लोकमत

मस्ट READ

# कलकसा येथे 'आमची दिवाळी वंचितांसाठी' उपक्रम उत्साहात

नवीन वस्त्र, शालेय व क्रीडा साहित्यांचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

सुमारे ४३ कुटुंबातील २८७ महिला-पुरुषांना व मुलांना कपडे, फराळ व साहित्य वाटप केले

कार्यक्रमात चैनसिंग मडावी, शनोद दास, चेतक झंझाड, अण्णा जैन व अन्य.

Hello Gondia Page No. 2 Oct 24, 2025 Powered by: erelego.com

ePaper नवराष्ट्र Gondia | 24 October 2025 | Page 4

जाणीव — दिवाळीनिमित्त कलकसा येथे 'आमची दिवाळी वंचितांसाठी' उपक्रम

# वंचितांच्या चेहऱ्यावर उमटले समाधानाचे हास्य

दानदात्यांचे लाभले मार्गदर्शन

## आयोजनाचे साफल्य :

दिनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने "आमची दिवाळी वंचितांसाठी" हा सामाजिक उपक्रम महाराष्ट्र व छत्तीसगड राज्याच्या सीमेलगत असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त भागातील सालेकसा तालुक्यातील पत्थराटोला या गावात आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत गावातील ४५ कुटुंबांतील एकूण २९७ गरजू नागरिकांना नवीन वस्त्र, दिवाळी फराळ व मिष्ठान्नाचे वाटप करण्यात आले. तसेच गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व क्रीडा साहित्य देऊन त्यांच्या शिक्षण व सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम व आदिवासी भागातील गरजू कुटुंबांना दिवाळीचा आनंद अनुभवता आला तसेच सामाजिक बांधिलकी जपत गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य संस्थेमार्फत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व सहकार्य करणाऱ्या मान्यवर, स्वयंसेवक आणि नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# शिक्षण-सामाजिक

## ४) दिनबंधु अभ्यासिका लोकार्पण सोहळा

दि. २८ डिसेंबर २०२५

ग्राम : देवरी, ता. देवरी, जि. गोंदिया

### आयोजनाचे उद्देश :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी यांच्या वतीने गोंदिया जिल्ह्यातील आदिवासीबहुल व ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक-युवती यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या हेतूने स्थानिक देवरी येथे आत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज "दिनबंधु अभ्यासिका" सुरू करण्यात आली.

ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण तसेच विविध शासकीय व निमशासकीय भरती प्रक्रियेच्या तयारीसाठी आवश्यक असलेले शांत, सुरक्षित व प्रेरणादायी अभ्यासाचे वातावरण उपलब्ध होत नसल्याचे लक्षात घेऊन संस्थेनी हा उपक्रम हाती घेतला. सदर अभ्यासिकेमध्ये विद्यार्थ्यांना नियमित व शिस्तबद्ध अभ्यासासाठी प्रशस्त बैठक व्यवस्था, वाचनासाठी आवश्यक संदर्भ साहित्य, वर्तमानपत्रे, स्पर्धा परीक्षेसंबंधी मासिके, अखंडित वीजपुरवठा, इंटरनेट सुविधा तसेच स्वच्छ व सकारात्मक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे.



# काही क्षणचित्रे





***विशेष उपस्थिती :***

**उद्घाटक :**

मा.श्री.संजय पुराम,
आमदार, आमगांव विधानसभा क्षेत्र.

**अध्यक्ष :**

मा. श्री. विरेंद्र अंजनकर,
मार्गदर्शक, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था.

**विशेष अतिथी :**

- मा. श्री. उमेश काशिद,
  प्रकल्प अधिकारी, ए. आ. वि. प्रकल्प देवरी.
- मा. श्रीमती कविता गायकवाड,
  उपविभागय अधिकारी, देवरी.
- मा. श्री. प्रताप वाघमारे, उपजिल्हाधिकारी, वर्धा.
- मा. श्री. संजु उईके, अध्यक्ष, नगरपंचायत देवरी.





दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी यांच्या पुढाकारातून स्थानिक देवरी येथे सुरू करण्यात आलेली आत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त "दिनबंधु अभ्यासिका" अल्पावधीतच ग्रामीण व आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि उपयुक्त शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास आली आहे.

### ***आयोजनाचे साफल्य :***

स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण तसेच विविध शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करण्याची जिद्द असलेल्या विद्यार्थ्यांना शांत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात अभ्यास करण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित अभ्यासाची सवय, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक दृष्टीकोन विकसित होत आहे.

अभ्यासिकेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यामध्ये कमी खर्चात गुणवत्तापूर्ण अभ्यास सुविधा उपलब्ध झाल्या असून, विविध स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनपर वातावरण निर्माण झाले आहे.





# शिक्षण-सामाजिक

## ५) शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे वितरण

दि. ५ फेब्रुवारी २०२६
स्थान : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
रोपा, ढोडरा, सुकळी, रामगड, मगरडोह, टेकरी, बाळापूर

### आयोजनाचे उद्देश :

आदिवासी बहुल नक्षलग्रस्त क्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आवश्यक असलेल्या शालेय साहित्याची उपलब्धता करून देणे, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक मदत मिळावी हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे, शाळेत नियमित उपस्थिती वाढवणे आणि ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार करणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.



## संस्थेचे कार्य

### *उपस्थित मान्यवर :*

- मा. श्री. संतोष गुट्टे, पोलीस उपनिरीक्षक, ए.ओ.पी.मगरडोह
- मा. श्री. विलास शिंदे, तालुका प्रतिनीधी, दैनिक लोकमत
- मा. श्री. युगेशकुमार बिसेन, सामाजिक कार्यकर्ता, देवरी
- मा. श्री. कुलदिप लांजेवार, अध्यक्ष दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

### *आयोजनाचे साफल्य :*

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वितरण करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल, व इतर आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षक, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शालेय साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आनंद व उत्साह निर्माण झाला तसेच नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली.या उपक्रमामुळे आदिवासी बहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लागला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. संस्था पदाधिकारी, शिक्षक व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.



देशोन्नती

# चिमुकल्यांच्या शिक्षणाला 'दिनबंधु'चा आधार

**देवरी :** दुर्गमभागातील मुलांचे शैक्षणिक भविष्य उज्वल व्हावे, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त मानल्या जाणाऱ्या पालांदूर पंचायत समिती क्षेत्रातील रोपा, सुकडी, ढोडरा, मगरडोह, रामगड, टेकरी, बाळापूर, चुंभली, पालांदूर येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना दिनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार, देवरी यांच्या वतीने गुरुवारी (दि.५) शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या या भागातील मुलांच्या चेहऱ्यावर या मदतीमुळे हास्य फुलले आहे.

सामाजिक उपक्रमासाठी सशस्त्र पोलिस दूरक्षेत्र मगरडोहचे पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे यांचे विशेष सहकार्य लाभले. दुर्गम भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधांचा अभाव असल्याने, त्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी दिनबंधू ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार, पोलिस दूरक्षेत्र मगरडोहचे पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे, राज्य राखीव पोलिस दलाचे उपनिरीक्षक गायधने, सुकळी ग्रामपंचायतीचे सरपंच कामेश्वर कल्लो, सामाजिक कार्यकर्ते विलास शिंदे, यशवंत गुरनुले, संदीप महोबीया, कमलेश पालीवाल, शुभम वाडीभस्मे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक हुंडरा, खोब्रागडे, शेख, गाढवे व शिक्षक वृंद उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक [illegible] जात आहे.

Gondia Edition
Feb 08, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com

लोकमत

# चिमुकल्यांच्या शिक्षणाला दिनबंधूने दिला आधार

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क



कार्यक्रमात कुलदीप लांजेवार, संतोष गुट्टे, गायधने, कामेश कल्लो यांच्यासह अन्य.

**देवरी :** दुर्गम भागातील मुलांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल व्हावे, या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त मानल्या जाणाऱ्या पालांदूर पं. स. क्षेत्रातील रोपा, सुकडी, ढोडरा, मगरडोह, रामगड, टेकरी, बाळापूर, चुंभली, पालांदूर येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या शेकडो विद्यार्थ्यांना दिनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार, देवरी यांच्यावतीने ५ फेब्रुवारी रोजी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या या भागातील मुलांच्या चेहऱ्यावर या मदतीमुळे हास्य उमटले आहे.

या सामाजिक उपक्रमासाठी सशस्त्र पोलिस दूरक्षेत्र मगरडोहचे पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे यांचे विशेष सहकार्य मिळाले. दुर्गम भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधांचा अभाव असल्याने, त्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी दिनबंधू ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार, पोलिस सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोहचे पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे, राज्य राखीव पोलिस दलाचे पोलिस उपनिरीक्षक गायधने, सुकळी ग्रामपंचायतीचे सरपंच कामेश कल्लो, 'लोकमत' प्रतिनिधी विलास शिंदे, सामाजिक कार्यकर्ते यशवंत गुरनुले, संदीप मोहबिया, कमलेश पालीवाल, शुभ[illegible] वाडीभस्मे यांच्यासह शाळेचे मुख्याध्याप[illegible] हुंडरा, खोब्रागडे, शेख, गाढवे व शिक्ष[illegible] उपस्थित होते. दुर्गम भागात काम करता[illegible] केवळ कायदा आणि सुव्यवस्था न राखत[illegible] सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे आ[illegible] असे मत पोलिस उपनिरीक्षक संतोष गु[illegible] यांनी व्यक्त केले. दिनबंधू ग्रामीण विका[illegible] संस्थेच्या या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्या[illegible] वह्या, पेन आणि इतर आवश्यक शैक्षणि[illegible] साहित्य मिळाल्याने पालकांनीही समाधा[illegible] व्यक्त केले आहे.

Hello Gondia
Page No. 3 Feb 07, 2026
Powered by: erelego.com

नवराष्ट्र Gondia | 07 February 2026 | Page 4

## देवरीच्या दिनबंधू ग्रामीण विकास संस्था व मित्र परिवाराचा स्तुत्य उपक्रम

# चिमुकल्यांच्या शिक्षणाला 'दिनबंधू'चा आधार

▶ देवरी, (ता.प्र.). दुर्गम भागातील मुलांचे शैक्षणिक भविष्य उज्वल व्हावे, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त मानल्या जाणाऱ्या पालांदूर पंचायत समिती क्षेत्रातील रोपा, सुकडी, ढोडरा, मगरडोह, रामगड, टेकरी, बाळापूर, चुंभली, पालांदूर येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना दिनबंधू ग्रामीण [illegible] आणि मित्र [illegible]

### सामाजिक बांधिलकी जपा

दुर्गम भागात काम करताना केवळ कायदा आणि सुव्यवस्था न राखता सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे आहे, असे मत पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे यांनी व्यक्त केले. दिनबंधू ग्रामीण विकास संस्थेच्या या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पेन आणि [illegible] शैक्षणिक साहित्य मिळाल्याने [illegible] केले आहे.



[illegible] यांचे विशेष सहकार्य लाभले. [illegible] घेणाऱ्या विद्यार्थ्यांना [illegible] असल्याने, त्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी दिनबंधू ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार, पोलिस दूरक्षेत्र मगरडोहचे पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे, राज्य राखीव पोलिस दलाचे उपनिरीक्षक गायधने, सुकळी ग्रामपंचायतीचे सरपंच कामेश्वर कल्लो, सामाजिक कार्यकर्ते विलास शिंदे, यशवंत गुरनुले, संदीप महोबीया, कमलेश पालीवाल, शुभम वाडीभस्मे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक हुंडरा, खोब्रागडे, शेख, गाढवे व शिक्षक वृंद उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.







# शिक्षण-सामाजिक

## ६) यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दि. १९ मार्च २०२६

स्थान : दिनबंधु अभ्यासिका देवरी

### आयोजनाचे उद्देश :

ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील विद्यार्थी न्ैछ परीक्षेत यशस्वी झाल्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित करण्याचा उद्देश

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी यांच्या वतीने ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून देशातील सर्वोच्च स्पर्धा परीक्षा न्ैछ मध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हा आहे.

या सत्कार समारंभाद्वारे ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये शिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण होऊन, कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर कोणतीही उंची गाठता येते, हा सकारात्मक संदेश समाजात पोहोचविणे अपेक्षित आहे. सामान्य कुटुंबातून येऊन राष्ट्रीय स्तरावर यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संघर्षमय प्रवासातून स्थानिक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन व प्रेरणा मिळावी, हा संस्थेचा प्रमुख हेतू आहे.



तसेच, ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रशासकीय सेवांमध्ये करिअर करण्याची प्रेरणा निर्माण करून, त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाचा सन्मान करणे आणि समाजामध्ये शिक्षण व स्पर्धा परीक्षांबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करणे, हा या कार्यक्रमामागील व्यापक सामाजिक उद्देश आहे. हा सत्कार समारंभ केवळ एका विद्यार्थ्याच्या यशाचा गौरव नसून, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना बळ देणारा आणि "परिस्थितीपेक्षा जिद्द मोठी असते" हा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरेल.





# संस्थेचे कार्य

### *उपस्थित मान्यवर :*

- मा. श्री. विवेक पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, देवरी
- मा. श्री. शुभम पाटील, उपजिल्हाधिकारी, गोंदिया
- मा. चि. हेमकृष्ण पिसदे, यशवंत विद्यार्थी
- मा. श्री. चेतन उईके, विश्वस्त, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी

### *आयोजनाचे साफल्य :*

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी यांच्या वतीने ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत देशातील सर्वोच्च स्पर्धा परीक्षा न्छ्ब मध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गौरवार्थ आयोजित करण्यात आलेला सत्कार समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी प्रेरणा, मार्गदर्शन व आत्मविश्वास प्राप्त झाला. प्रेरणादायी ठरला. यशस्वी विद्यार्थ्यांच्या संघर्षमय प्रवास, जिद्द, मेहनत व चिकाटीचा आदर्श उपस्थित युवक-युवतींसमोर निर्माण झाला."ग्रामीण भागातूनही सर्वोच्च शासकीय सेवांमध्ये स्थान मिळविता येते " हा सकारात्मक संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.



या सत्कार समारंभामुळे स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये UPSC/MPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण झाली असून, शिक्षण व करिअरबाबत नवी प्रेरणा मिळाली. पालक वर्गामध्येही आपल्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याची भावना दृढ झाली.

तसेच, संस्थेच्या या उपक्रमामुळे समाजात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याची सकारात्मक परंपरा निर्माण होण्यास मदत झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन, शिक्षण क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अत्यंत फलदायी व प्रेरणादायी ठरला.



TheHitavada
Vidarbha Line | 2026-03-21 | Page- 8
ehitavada.com

**Don't get discouraged by failures, try to introspect: Hemkrishna Pisade**

Hemkrishna Pisde addressing the students.

■ Our Correspondent
DEORI, Mar 20

"TO ACHIEVE success in competitive exams, book knowledge is not enough, it is necessary to study honestly with oneself. If we fully understand the syllabus of the exam for which we are preparing and if we try with determination and perseverance along with proper planning, then success will definitely be achieved," asserted Hemkrishna Pisade.

Pisde a youth from the Deori, who has recently passed out the UPSC examination was speaking at a felicitation and guidance workshop organised by Dinbandhu Gramin Vikas Sanstha at Dinbandhu Abhyasika in Deori. The programme was presided over by Sub-Divisional Police Officer Vivek Patil. Tehsildar Shubham Patil, Sanstha's President Kuldeep Lanjewar, Chetan Uike, Vilas Shinde, Sandeep Mahobiya and Sanjay Kashiwar were chiefly present on the occasion.

Speaking further, recounting his inspiring journey, Hemkrishna Pisade said, "The journey from primary school to graduation from government institute was challenging. Don't get discouraged with failures in life, but introspect as to why you didn't get the success and try to fill the gaps and prepare vigorously again."

While guiding the students, Tehsildar Shubham Patil said that students should work on doing micro-planning. In his presidential address, Vivek Patil appealed to the successful candidates to help other aspiring youths from their areas. He also emphasised that there is no substitute for hard work. A special question and answer session was held in the latter half of the programme. In this, students from the study centre asked questions regarding the difficulties they faced while studying, which were satisfactorily resolved by the administrative officers present.

The programme was conducted by Kuldeep Lanjewar and was moderated by Anshul Lanjewar while Deepak Lanjewar proposed vote of thanks. Muneshwar Raut, Prateek Raut and other students contributed to the success of the event.



देशोन्नती

**स्पर्धा परीक्षेत यशासाठी स्वतःशी प्रामाणिक राहणे आवश्यक : हेमकृष्ण पिसदे**

**दिनबंधू अभ्यासिकेतर्फे यशवंतांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न**

देशोन्नती वृत्तसंकलन

**देवरी** : 'स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर स्वतःशी प्रामाणिक राहून अभ्यास करणे आवश्यक आहे. ज्या परीक्षेची आपण तयारी करत आहोत, तिचा अभ्यासक्रम पूर्णपणे समजून घेऊन, योग्य नियोजनासह जिद्द आणि चिकाटीने प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते,' असे प्रतिपादन संघ लोकसेवा आयोगाच्या (ळइएण) परीक्षेत यश मिळवणारे सुपुत्र हेमकृष्ण पिसदे यांनी केले.

स्थानिक दिनबंधू ग्रामीण विकास संस्था द्वारा संचालित दिनबंधू अभ्यासिकेत आयोजित यशवंतांचा सत्कार आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी (एऊझ) विवेक पाटील होते. तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार शुभम पाटील, संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार, विश्वस्त चेतन उईके, सामाजिक कार्यकर्ते विलास शिंदे, संदीप महोबिया आणि संजय काशिवार उपस्थित होते.

आपल्या प्रेरणादायी प्रवासाचा उलगडा करताना हेमकृष्ण पिसदे म्हणाले की, 'जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेपासून ते पदवीपर्यंतचा प्रवास आव्हानात्मक होता. एखाद्या परीक्षेत अपयश आल्यास खचून न जाता, आपल्याला कमी गुण का मिळाले याचे आत्मपरीक्षण करा. उणिवा भरून काढून पुन्हा जोमाने तयारी केल्यास ध्येय गाठता येते, असे व्यक्त केले.

तहसीलदार शुभम पाटील यांनी स्पर्धा परीक्षेत किती पुस्तके वाचली यापेक्षा परीक्षेच्या दृष्टीने नेमके काय वाचले, याला महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी सूक्ष्म नियोजन करूनच अभ्यासाला दिशा द्यावी, असे व्यक्त केले. तर उपविभागीय अधिकारी विवेक पाटील यांनी यशस्वी उमेदवारांना आवाहन केले की, यश मिळाल्यानंतर आपल्या भागातील जास्तीत जास्त युवक या क्षेत्रात कसे येतील, यासाठी त्यांना मदत करावी. कठोर परिश्रमाला पर्याय नसल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलदीप लांजेवार यांनी केले. संचालन अंशुल लांजेवार तर आभार प्रदर्शन दीपक लांजेवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुनेश्वर राऊत, प्रतीक राऊत व अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

Gondia Edition
Mar 21, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

## दिनबंधु ग्रामीण विकास संस्था

### आगामी धोरण
### व्हिजन २०३०

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, युवकांना संधी, महिलांचे सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धन यांना क्रेंदस्थानी ठेवून संस्थेचे आगामी धोरण पुढील प्रमाणे असू शकते. ग्रामीण विकास क्षेत्रातील यशस्वी संस्थांच्या कार्यपद्धतींमध्ये समुदाय सक्षमीकरण, शाश्वत उपजीविका, कौशल्यविकास, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संरक्षण या बाबींना प्राधान्य दिले जाते.

**प्रमुख उद्दिष्टे :** • ग्रामीण युवकांचे कौशल्य व रोजगार निर्मिती • रोजगाराभिमुख प्रशिक्षण • स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन • डिजिटल साक्षरता अभियान

**महिला सक्षमीकरण :** • बचत गटांचे बळकटीकरण • महिला उद्योजकता प्रोत्साहन • आरोग्य व कायदेविषयक जनजागृती

**शिक्षण व विद्यार्थी विकास :** • गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत • स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन • वाचनालय व डिजिटल शिक्षण केंद्र

**कृषी व शेतकरी विकास :** • सेंद्रीय शेती प्रोत्साहन • जलसंधारण व जल व्यवस्थापन • शेतकरी उत्पादक गट (एफपीओ) निर्मिती

**पर्यावरण संवर्धन :** • वृक्षारोपण व संवर्धन • प्लास्टिकमुक्त गाव अभियान • जल, जंगल व जमीन संरक्षण उपक्रम

**आरोग्य व सामाजिक सुरक्षा :** • मोफत आरोग्य तपासणी शिबिरे • रक्तदान व अवयवदान जनजागृती • व्यसनमुक्ती अभियान

**सुशासन व नागरिक सक्षमीकरण :** • आरटीआय, सामाजिक हक्क व शासकीय योजनांची माहिती • ग्राम विकास नियोजनात नागरिकांचा सहभाग • लोकशाही मूल्यांचे संवर्धन

### संस्थेचे ब्रीद

‘सेवा, विकास आणि सक्षमीकरणाच्या माध्यमातून स्वावलंबी व समृद्ध ग्रामीण समाज निर्माण करणे.’

**‘गावाच्या विकासासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी आणि नव्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिनबंधू ग्रामीण विकास संस्था कटिबद्ध!’**

नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

DINBANDHU

Gramin Vikas sanstha, Deori

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.